MHYA160001922022

अर्ज दाखल तारीख : १६/०२/२०२२.
अर्ज नोंदणी तारीख : १६/०२/२०२२.
निकालाची तारीख : १२/०३/२०२६.
कालावधी : ०४ वर्ष ०० महिने १७ दिवस

# न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांचे न्यायालय, बाभुळगाव

(पीठासीन अधिकारी – श्री एच.एस.सातपुते यांचे समोर)

**किरकोळ फौजदारी अर्ज क्र. ०८/२०२२.** **निशाणी क्र.२३**

[१] **सौ. सुनंदा विनोद मडावी**,
वय – ३६ वर्षे, धंदा– काही नाही,
[२] **श्रध्दा विनोद मडावी**,
वय – १२ वर्षे, धंदा– शिक्षण,
[३] **सानिया विनोद मडावी**,
वय – ९ वर्षे, धंदा– शिक्षण,
अ.प.का. अर्जदार क्र. १
सर्व, रा. देविदासजी गेडाम यांच्या घरी, .....**अर्जदार**.
रा. विरखेड, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ

:: **विरुध्द** ::

[१] **श्री. विनोद वामण मडावी,**
वय–४२ वर्षे, धंदा – मजूरी,
रा. विरखेड, ता. बाभुळगाव, जि. यवतमाळ .....**गैरअर्जदार**.

**अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये.**

..........................................................................................

अर्जदारातर्फे विधीज्ञ – श्री. एस. डी. गावंडे
गैरअर्जदारतर्फे – श्री. एम. एम. दातार

..........................................................................................

## न्या य नि र्ण य
## (घोषित दिनांक १२/०३/२०२६)

अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम १२ अन्वये प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. **अर्जदाराचे थोडक्यात कथन असे की,**

अर्जदार क्र.१ हिचे लग्न दिनांक २४.०५.२००६ रोजी समाजातील रितीरिवाजाप्रमाणे मौजे मादणी, ता. बाभुळगाव जि. यवतमाळ येथील मंदीरात संपन्न झाले. अर्जदार क्र. १ ही लग्नानंतर गैरअर्जदार याच्याकडे नांदावयास गेली. अर्जदार क्र. १ हिला सदर लग्न संबंधातून अर्जदार क्र. २ व ३ या दोन मुली झालेल्या आहेत. गैरअर्जदार याने लग्नानंतर काही दिवस अर्जदार क्र. १ हिला चांगली वागणूक दिली. त्यानंतर मात्र गैरअर्जदाराला दारु पिण्याचे व्यसन असल्याने तो अर्जदार क्र. १ हिला रात्री बेरात्री घराच्या बाहेर काढून देत होता. गैरअर्जदार हा अर्जदार क्र. १ हिला माहेरुन पैसे आणण्याकरीता बेदम मारहाण करुन शारीरीक व मानसीक त्रास देत होता. त्यामुळे अर्जदार क्र. १ ही तिच्या मुलींना घेवून माहेरी तिच्या आईवडीलांकडे गेली. अर्जदार क्र. १ हिने अनेकवेळा गैरअर्जदार याला नांदावयास घेवून जाण्याची विनंती केली. अर्जदार क्र. १ ही तिच्या मुलींसह माहेरी राहत असल्यापासून गैरअर्जदाराने त्यांच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीही रक्कम दिलेली नाही. अर्जदार क्र. १ हिच्या आईवडीलांची आर्थीक परिस्थीती गरीबीची असल्याने अर्जदार क्र. १ व तिच्या मुलींच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे.

३. अर्जदार यांच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. गैरअर्जदार हा मोलमजूरी करुन दररोज ७००/– ते ८००/– रुपये कमवितो. गैरअर्जदार याच्यावर अर्जदार यांच्या व्यतिरिक्त कोणीही अवलंबुन नाही. अर्जदारांना सांभाळण्याची गैरअर्जदार याची नैतीक व कायदेशीर जबाबदारी आहे. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिने स्वतः करीता दरमहा ६०००/– रुपये व अर्जदार क्र. २ व ३ यांच्याकरीता दरमहा २०००/– रुपये पोटगी, संरक्षण आदेश, नुकसान भरपाई इत्यादी मागणी केलेली आहे.

४. गैरअर्जदाराला अर्जाच्या नोटीसची योग्यरीत्या बजावणी झाल्यानंतर त्याने प्रकरणात हजर होवून निशाणी क्र. १३ वर म्हणणे दाखल करुन अर्जदारांच्या अर्जातील संपूर्ण कथने नाकारलेली आहेत. गैरअर्जदार याच्या म्हणण्यानुसार अर्जदार क्र. १ ही लग्नानंतर त्याची धर्मपत्नी म्हणून त्यांच्याकडे नांदावयास आली. अर्जदार क्र. १ ही लग्नानंतर एक वर्ष चांगली नांदली. त्यानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार याच्यासोबत शुल्लक कारणावरुन भांडण करुन विनाकारण त्रास देत होती. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार याच्या आईला देखील उध्दट वागणूक देवून अपमानीत करीत होती. गैरअर्जदार हा कामावरुन आल्यानंतर संपूर्ण मजूरीची रक्कम ही अर्जदार क्र. १ घेत होती. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदारासोबत भांडण करुन माहेरी निघून जात होती. गैरअर्जदार हा अर्जदार क्र. १ हिला पुन्हा नांदावयास घेवून गेल्यास केवळ ५ ते ६ दिवस अर्जदार क्र. १ ही चांगली वागत होती. त्यानंतर अर्जदार क्र. १ ही शुल्लक कारणावरुन गैरअर्जदारासोबत भांडण करुन माहेरी निघून जात होती. गैरअर्जदार हा गरीब कुटूंबातील असून त्याला आठवडयातून २ ते ३ दिवस काम मिळते. गैरअर्जदार हा दिवसाकाठी ३००/– रुपये कमवितो. गैरअर्जदारावर त्याच्या आईची जबाबदारी देखील आहे. गैरअर्जदार हा अर्जदारांना आजही संभाळण्यास तयार आहे. गैरअर्जदार हा अर्जदारांना पोटगी देण्यास असमर्थ आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. अर्जदार व गैरअर्जदार यांच्या म्हणन्यातील कथने, अर्जदाराचा व गैरअर्जदाराचा तोंडी पुरावा, अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. एस. डी. गावंडे व गैरअर्जदारातर्फे विधिज्ञ श्री. एम. एम. दातार यांचा सविस्तर युक्तिवाद ऐकल्यानंतर माझेपुढे खालील मुद्दे उपस्थित झाले असून मी त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह त्यापुढे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ही असे सिध्द करते का, गैरअर्जदाराने तिचा मानसिक व शारीरिक छळ करुन तिच्यावर कौटुंबिक स्वरुपाचा हिंसाचार केला आहे ? | ...होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| २. | अर्जदार हे गैरअर्जदारयाच्याकडुन दरमहा मागणी प्रमाणे पोटगी मिळण्यास पात्र आहेत का ? | ...होय, अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ३. | अर्जदार क्र. १ ही तिच्या हक्कात संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे का ? | ...होय, अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ४. | अर्जदार ही गैरअर्जदाराकडून नुकसान भरपाईपोटी रक्कम रु.५०,०००/– मिळण्यास पात्र आहे का ? | ...होय, अंतिम आदेशाप्रमाणे. |
| ५. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

६. अर्जदारांतर्फे निशाणी क्र. १४ वर स्वतःचे शपथपत्र दाखल करुन साक्षीदार क्र. १ म्हणून तपासलेले आहे. अर्जदाराने निशाणी क्र. १८ वर पुरावा संपल्याची पुरशिस दाखल केली आहे. गैरअर्जदारातर्फे निशाणी क्र. १९ वर स्वतःचे शपथपत्र दाखल करुन साक्षीदार क्र. १ म्हणून तपासलेले आहे. गैरअर्जदाराने निशाणी क्र. २० पुरावा संपल्याची पुरसीस दाखल केली आहे.

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्रमांक १ करीता</u>** :–

७. अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम १२ या तरतुदीअन्वये हा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांना त्यांच्यातील पतीपत्नीचे नातेसंबंध मान्य आहेत. अर्जदार क्र. १ हिचे लग्न गैरअर्जदारासोबत दिनांक २४.०५.२००६ रोजी झालेले आहे. अर्जदार लग्नानंतर गैरअर्जदार याच्याकडे नांदावयास गेल्यानंतर सदरच्या लग्न संबंधातून अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांना अर्जदार क्र. २ व ३ या दोन मुली झालेल्या आहेत या बाबी उभय पक्षांना मान्य आहेत.

८. मुद्दा क्र.१ हा अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार हे सदरच्या लग्न संबंधातून एका छताखाली राहत असतांना गैरअर्जदार याने अर्जदार क्र. १ हिचा कोटूंबिक स्वरुपाचा हिंसाचार केला आहे का याबाबत काढलेला आहे. अर्जदार क्र. १ हिच्या शपथपत्रातील कथनांचा विचार करता गैरअर्जदार याने दारु पिवून अर्जदार क्र. १ हिला पैशाची मागणी करुन मारहाण केली व रात्री बेरात्री तिला घराबाहेर हाकलून दिले असे न्यायालयाच्यापुढे शपथेवर सांगीतलेले आहे. गैरअर्जदार याने निशाणी क्र. १९ वर घेण्यात आलेला उलटतपासात स्वतः असे सांगीतले आहे की, तो हप्त्यातून एक वेळा दारु पितो. गैरअर्जदार याने निशाणी क्र. १३ वर दिलेल्या म्हणण्यामध्ये अर्जदाराने गैरअर्जदाराविरुध्द खोटा रिपोर्ट दिला होता असे देखील सांगीतलेले आहे. माझ्यापुढे निशाणी क्र. ७ वर संरक्षण अधिकारी, बाभुळगाव यांनी दाखल केलेला कौटूंबिक घटना अहवाल दाखल असून सदरच्या कौटूंबिक अहवालाचे अवलोकन केले असता त्यामध्ये देखील गैरअर्जदार याने अर्जदार क्र. १ वर कौटूंबिक स्वरुपाचा हिंसाचार केल्याचे नमुद आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्रमांक १ करीता</u> :-

९. मी मुद्दा क्र. १ च्या चर्चेअंती गैरअर्जदार याने अर्जदार क्र. १ हिच्यावर कौटूंबिक स्वरुपाचा हिंसाचार केलेला आहे या निष्कर्षास आलेलो असल्याने व अर्जदार व गैरअर्जदार हे एकाच गावात राहत असल्याने अर्जदाराच्या हक्कात भविष्यात पुन्हा कोणत्याही स्वरुपाचा कौटूंबिक स्वरुपाचा हिंसाचार होवू नये यासाठी संरक्षण अधिकार देणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र. ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्रमांक २ व ४ करीता</u> :-

१०. मुद्दा क्र. २ हा अर्जदार क्र. १ ते ३ हे दरमहा गैरअर्जदार याच्याकडून पोटगी मिळण्यास पात्र आहेत का याबाबत काढलेला असून मुद्दा क्र. ४ हा अर्जदार क्र. १ ही तिच्यावर झालेल्या शारीरीक व मानसीक त्रासापोटी नुकसान भरपाई मिळण्यास पात्र आहे का याबाबत काढलेला आहे. अर्जदार क्र. १ हिच्यावर मी मुद्दा क्र. १ च्या चर्चेअंती

गैरअर्जदाराने कौटूंबिक स्वरुपाचा हिंसाचार केलेला आहे या निष्कर्षास आलेलो आहे. अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ व ३ यांना घेवून गैरअर्जदार याने तिच्यावर केलेल्या कौटूंबिक हिंसाचारामुळे गेल्या ५ ते ६ वर्षापासून तिच्या माहेरी आईवडीलांकउे राहत आहे. अर्जदार क्र. २ व ३ या शिक्षण घेत आहेत. अर्जदार क्र. १ हिच्या म्हणण्यानुसार त्यांचयाकडे कोणतेही उत्पन्नाचे साधण नाही. गैरअर्जदार हा मोल मजूरी करुन दिवसाकाठी ७००/– ते ८००/– रुपये मिळवितो. अर्जदाराने तिच्या म्हणण्यातील कथने निशाणी क्र. १४ वर शपथपत्र दाखल करुन पुन्हा न्यायालयाच्यापुढे सांगीतलेली आहेत. अर्जदारांच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्यामध्ये अर्जदार क्र. १ ही आधी मजूरी करीत होती. त्यावेळी तिला दररोज १००/– रुपये मिळत होते. पुरुषाने शेतात मजूरी केल्यास त्याला ५००/– रुपये मजूरी मिळते. शेतात दररोज मजूरीचे काम मिळत नाही. गैरअर्जदार हा शेतमजूरीच काम करतो. अर्जदार क्र. १ हिची सासू वृध्द असल्याने काहीही काम करीत नाही. अर्जदार क्र. १ च्या सासूची जबाबदारी ही गैरअर्जदारावर आहे या बाबी मान्य केलेल्या आहेत. गैअर्जदार याने देखील स्वतःचे निशाणी क्र. १९ वर शपथपत्र दाखल करुन तो रोजमजूरीचे काम करीत असून ३००/– रुपये रोज मिळवितो. गैअर्जदार याच्यावर त्याच्या आईची देखील जबाबदारी आहे असे न्यायालयाच्यापुढे सांगीतलेले आहे. गैरअर्जदाराच्या उलटतपासाचे अवलोकन केले असता त्याने अर्जदार क्र. १ ही मुलींना घेवून माहेरी राहत असल्यापासून त्यांच्या खाण्यापिण्याची, कपडेलत्याची व ईतर जिवनआवश्यक गरजांची, शिक्षणाची कोणतीही सोय केलेली नाही. गैरअर्जदार हा ३००/– रुपये रोजीने कामाला जातो या बाबी मान्य केल्या आहेत.

११. गैरअर्जदार हा रोजमजूरीने कामाला जात असून त्याला आजच्या महागाईचा विचार करता दररोज ५००/– रुपये रोजगार मिळत असावा असे माझे मत आहे. गैरअर्जदार याची अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ या मुली असल्याने त्यांना सांभाळण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी ही गैरअर्जदारावर आहे. अर्जदार क्र. १ ही तिच्या मुलींना घेवून मागील ५ ते ६ वर्षापासून माहेरी राहत असल्यापासून त्यांच्या कपडयालत्याची, अन्नधान्याची, जिवनावश्यक गरजांची, औषधपाण्याची व शिक्षणाची कोणतीही सोय गैरअर्जदारांनी केलेली नाही. गैरअर्जदार हा अर्जदार क्र. १ हिला दरमहा १५००/– रुपये पोटगी व अर्जदार क्र. २ व ३ यांना दरमहा प्रत्येकी १०००/– रुपये

पोटगी देण्यास सक्षम आहे यामतास मी आलेलो आहे. गैरअर्जदारावर त्याच्या आईला सांभाळण्याची जबाबदारी असली तरी अर्जदारांसंबंधी त्याची असलेली कायदेशीर जबाबदारी तो टाळू शकत नाही. म्हणून मी मुद्दा क्र. २ करीता वरील प्रमाणे उत्तर नोंदवित आहे. अर्जदार क्र. १ हिच्यावर गैरअर्जदाराने केलेल्या कौटूंबिक हिंसाचारापोटी नुकसान भरपाई म्हणून ५०००/– रुपये देणे आवश्यक वाटते. म्हणून मी मुद्दा क्र. ४ चे उत्तर वरील प्रमाणे नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ५ करीता</u>** :–

१२. वरील चर्चेअंती मी मुद्दा क्र. ५ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१) अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२) गैरअर्जदारने अर्जदार क्र. १ हिला दरमहा रक्कम रु. १५००/– व अर्जदार क्र. २ व ३ यांना दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये १०००/– पोटगी म्हणून या न्यायनिर्णयाच्या तारखेपासून द्यावी, असा आदेश देण्यात येतो.

३) गैरअर्जदार याने अर्जदार क्र. १ हिला केलेल्या शारीरिक व मानसीक छळापोटी नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु. ५,०००/– द्यावेत, असा आदेश देण्यात येतो.

४) अर्जदार १ हिच्यावर गैरअर्जदार याने कोणत्याही स्वरुपाचा कौटुंबिक हिंसाचार करु नये, असा संरक्षण आदेश अर्जदाराच्या हक्कात देण्यात येतो. अर्जदाराने सदरच्या आदेशाची अंमलबजावणी संबंधीत पोलीस स्टेशनच्या मदतीने करुन घ्यावी.

५) अर्जदार क्र. १ हिला गैरअर्जदाराने निशाणी क्र. ११ वरील आदेशाने नेमुन दिलेली अंतरिम पोटगी ही त्यावरील आदेशाप्रमाणे या न्यायानिर्णयाच्या तारखेपर्यंत दयावी.

६) आदेशाची एक प्रत अर्जदार, पोलीस ठाणे अधिकारी, संरक्षण अधिकारी यांना विनामुल्य देण्यात यावी.

७) अर्जदारच्या अर्जाचा खर्च म्हणून गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हिला ५००/- रुपये दयावेत.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by HARIDAS SANDIPAN SATPUTE
Date: 2026.03.23 11:31:05 +0530

बाभुळगाव (एच.एस. सातपुते)
दिनांक - १२/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,बाभुळगाव